# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे- ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

दूरध्वनी क्रमांक : ०२०– २५६२११५६/५७/७९
Telephone : 020-25621156/57/79
ईमेल/ Email : boards@pun.unipune.ac.in

शैक्षणिक विभाग (मान्यता कक्ष)
Academic Section (Approval Unit)
वेबसाइट/ Website: www.unipune.ac.in

## परिपत्रक क्र. १६७/२०२६

**विषय:** Choice Based Credit System (CBCS) अभ्यासक्रम आराखड्यासाठी पदवी व पदव्युत्तर पदवी स्तरावर लागू करण्यात आलेले ४ अनिवार्य व अतिरिक्त श्रेयांक अभ्यासक्रम राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार अनिवार्य व अतिरिक्त श्रेयांकांऐवजी ऐच्छिक व अतिरिक्त करण्याबाबत...

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सर्व संबंधितांस या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, Choice Based Credit System (CBCS) अभ्यासक्रमप्रणालीदरम्यान पदवी व पदव्युत्तर पदवी स्तरावर पुढे नमूद केलेले ४ अनिवार्य व अतिरिक्त श्रेयांक अभ्यासक्रम अनिवार्य व अतिरिक्त (Extra Mandatory) श्रेयांकांऐवजी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार ऐच्छिक (Optional) स्वरूपातील अतिरिक्त श्रेयांक करण्यास शैक्षणिक वर्ष २०२६–२७ पासून निर्देशित करण्यात येत आहे.

1. Human Rights (2 Credits)
2. Introduction to Cyber Security/ Information Security (4 Credits)
3. Skill Development (4 Credits)
4. Introduction to Constitution (2 Credits)

तसेच शैक्षणिक वर्ष २०२६–२७ पासून वरीलपैकी चारही अभ्यासक्रमांचे एकूण शुल्क हे शुल्क निर्धारण समितीकडून लवकरच निर्धारित करण्यात येणार असून, त्यानुसार यापूर्वी लागू असलेले शिक्षण व परीक्षा शुल्क पुढील आदेश निर्गमीत होईपर्यंत वरीलपैकी चारही अभ्यासक्रमांसाठी आकारण्यात येऊ नये, असेही सर्व संबंधितांस निर्देशित करण्यात येत आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२६–२७ साठी प्रवेश घेताना असे शुल्क भरावे लागले असेल तर अशा सर्व संबंधित विद्यार्थ्यांना या शुल्काचा परतावा संबंधित विद्यापीठ विभाग/संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांचे मार्फत प्रक्रिया करून देण्यात येईल आणि ऐच्छिक स्वरूपातील श्रेयांकाधारित शुल्क निर्धारणानुसार शुल्क आकारण्यात येईल.

मा. विभागप्रमुख/प्राचार्य/संचालक, संबंधित विद्यापीठीय शैक्षणिक विभाग/ संबंधित सर्व संलग्नित तसेच स्वायत्त महाविद्यालये/ संबंधित सर्व संलग्नित मान्यताप्राप्त परिसंस्था यांना विनंती की, सदर परिपत्रकाचा आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा.

गणेशखिंड, पुणे – ४११००७ )
जावक क्र. N/65 )
दिनांक : 03/08/2026 )

3/8/2026

(स. द. डाखर)
उपकुलसचिव

**प्रत माहितीसाठी:**

१. मा. कुलगुरू कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा. प्र–कुलगुरू कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
३. मा. कुलसचिव कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ

**प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी:**

१. मा. अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
३. मा. विभागप्रमुख, सर्व विद्यापीठीय शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
४. मा. प्राचार्य, सर्व संलग्न महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ
५. मा. प्राचार्य, सर्व स्वायत्त महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ
६. मा. संचालक, सर्व मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रस्तुत विद्यापीठ
७. मा. संचालक, अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ
८. मा. उपकुलसचिव, संलग्नता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
९. मा. उपकुलसचिव, शैक्षणिक प्रवेश विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
१०.मा. उपकुलसचिव, शैक्षणिक पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
११.मा. संचालक, माहिती तंत्रज्ञान सेवा विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
१२.सहायक कुलसचिव, अहिल्यानगर व नाशिक विद्यापीठ उपकेंद्र

संदर्भ : टिपणी क्र. एन/६५, दि. ०३/०८/२०२६
(व्ही.सी. टिपणी क्र. ३२४३, दि. ०३/०८/२०२६)